पुणे पोलीस
Pune Police

जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph**.020 / 26122478

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्रमांक - ३४ दिनांक - १३/०१/२०२४**

मार्केटयार्ड पोलीस ठाणे

## अल्पवयीन मुलीशी फ्रि फायर गेम मार्फत ऑन लाईन मैत्री करून, तिला धमकावणा-या बिहारीस ठोकल्या बेडया

फिर्यादी यांची मुलगी हिचे बरोबर ऑन लाईन फ्रि फायर गेम मार्फत ऑन लाईन मैत्री करून सन २०२३ मध्ये फिर्यादी यांची अल्पवयीन मुलगी हिला जिवे ठार मारील अशी धमकी देवून, तिचे न्यूड फोटो व्हाट्सअॅप व्दारे त्याला पाठविण्यास भाग पाडून त्याचेशी रिलेशनशिप मध्ये नाही राहिली तर ते फोटो तिच्या नातेवाईकांना पाठविल अशी वेळोवेळी धमकी देवून तिच्या मनाला लज्जा उत्पन्न होईल असे न्यूड फोटो पाठवले असल्याने आरोपी याचे विरूध्द मार्केट यार्ड पोलीस ठाणे येथे बालकांचे लैगिक अपराधापासून संरक्षण अधि. सन २०१२ चे कलम ११,१२, भा.द.वि. कलम, ३५४,३५४ (ड), तसेच आय.टी. ॲक्ट ६६ (ई) प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला.

गुन्हा दाखल झालेवर गुन्हयातील आरोपीचे पुर्ण नाव व पत्ता माहित नसताना फक्त ०४ मोबा. क्र. तक्रारीत नमुद असल्याने मोबाईल क्रंमाक चे तांत्रिक विश्लेषण केल्यावर आरोपीचा बिहार मधील अपुर्ण पत्ता मिळून आला. परंतू त्या नंतर सतत मोबा. क्र. चे क्लिष्ट तांत्रीक विश्लेषण करून हरपुर, जि. बेगुसुराय, राज्य बिहार असे लोकेशन येत असल्याने तपासी अधिकारी स्वप्नाली शिंदे, पो.हवा. किशोर पोटे, पो.हवा. अमित जाधव, म.पो.हवा. धनश्री गोफणे असे तात्काळ बेगुसुराय बिहार येथे रवाना झाले. तेथे त्यांनी वेषांतर करून आरोपीची सर्व माहिती घेतली व त्यानंतर बिहार पोलीसांच्या मदतीने संवेदनशिल भागातून **आरोपी अमनकुमार पंकज तांटी वय. २० वर्षे धंदा. शिक्षण रा. वॉर्ड नं. ११, हरपुर जि. बेगुसुराई, राज्य बिहार यास रिफायनरी ओ. पी. (बरौली् थाना)** यांचे मदतीने शिताफिने अटक करून गुन्हयात वापरलेला मोबाईल. फोन हस्तगत केला.

सदरची कारवाई मा.अपर पोलीस आयुक्त पुर्व विभाग पुणे शहर श्री.रंजनकुमार शर्मा, मा.पोलीस उप आयुक्त परि. ०५ श्री आर.राजा., मा.सहा.पोलीस आयुक्त वानवडी विभाग श्री शाहूराजे साळवे, मार्केट यार्ड पोलीस ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री सुरेशसिंग गौड, यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्रीमती स्वप्नाली शिंदे, पोलीस अंमलदार किशोर पोटे, अमित जाधव, म.पो.अंम. धनश्री गोफणे यांचे पथकाने केली आहे.